# - सभासद कन्या विवाह ठेव योजना नियमावली -

सभासदांच्या कन्येचा सन्मान करण्यासाठी दि.०७/०७/२०२४ रोजी झालेच्या वार्षिक सर्वसाधारण सभेतील निर्णयानुसार सभासदांना त्यांच्या कन्येच्या विवाहनिमित्त **‘सभासद कन्या विवाह ठेव’** योजना दिनांक ०१/०८/२०२४ पासुन सुरु करण्यात आली आहे. या योजनेव्दारे सभासदांच्या कन्येच्या विवाहाच्या दिवशी बँकेकडुन या योजनेअंतर्गत ठेव पावती स्वरुपात तिला **‘भेट’** दिली जाणार आहे. ही भेट मुदत ठेव पावतीच्या स्वरुपात राहणार असुन हया ठेवीची **मुदत ५ वर्षे** इतकी असणार आहे म्हणुन या योजनेस **‘सभासद कन्या विवाह ठेव’** योजना असे नाव ठेवण्यात आले आहे.

या योजनेच्या अटी व शर्ती खालीलप्रमाणे राहतील.

**अटी व शर्ती :**

१. या योजनेअंतर्गत सभासदांच्या कन्येच्या विवाहानिमित्त बँकेमार्फत ठेव पावती स्वरुपात भेट देणार असल्याने या योजनेस **सभासद कन्या विवाह ठेव** भेट योजना असे संबोधण्यात येईल.

२. या योजनेसाठी दरवर्षीच्या वार्षिक सर्वसाधारण सभेच्या मान्यतेने नफ्यातुन पुरेशी रक्कमेची **तरतूद** करण्यात येईल, ही तरतुद जो पर्यंत शिल्लक असेल तो पर्यंत ही मदत दिली जाईल.

३. या योजनेअंतर्गत सभासदाच्या फक्त कन्येच्या विवाहानिमित्त व विवाहाच्या दिवशी तिला भेट म्हणुन भेट रक्कमेची **ठेव पावती** दिली जाईल, ही ठेव पावती आपल्याच बँकेत मुदत ठेवीत गुंतविली जाईल व तिची **मुदत ५ वर्षे** इतकी राहील. त्यानंतर नुतणिकरण करावयाचे किंवा कसे हे त्या कन्येवर अवलंबुन असेल. मुदतीनंतर मुद्दल अधिक व्याज अशी एकत्रित रक्कम सदर कन्येस दिली जाईल.

४. सदयस्थितीत या योजनेअंतर्गत **रु.११,०००/-** इतकी रक्कम निश्चित करण्यात आली असुन भविष्यात या रक्कमेत वाढ किंवा घट करण्याचा अधिकार संचालक मंडळास राहील.

५. या योजनेची सुरुवात **दि. १ ऑगस्ट २०२४** पासुन करण्यात येईल.

६. या योजनेचा लाभ घेणेसाठी संबंधीत सभासद हा बँकेचा **सभासद होवुन किमान १ वर्षे** पुर्ण झालेला असावा व त्याची मासिक वर्गणी नियमित आलेली असावी.

७. या योजनेअंतर्गत एका आर्थिक वर्षात **एक कुटुंबात फक्त एकदाच लाभ** घेता येईल. आर्थिक वर्ष ०१ एप्रिल ते ३१ मार्च या कालावधीचे राहील. जरी त्या कुटूंबात पती / पत्नी हे दोघेही सभासद असले तरी त्यांना एकच लाभ देय राहील.

८. या योजनेअंतर्गत देण्यात येणारा लाभ हा ही योजना चालू **झालेपासुन व नंतरच्या कालावधीत** होणाऱ्या कन्येच्या विवाहासाठी लागू राहील. या तारखेच्या अगोदर विवाह झाला असल्यास या योजनेचा लाभ देय राहणार नाही.

९. ही योजना **सभासदांच्या कन्येच्या सन्मान** करावयाच्या उद्देशाने करण्यात येत असल्याने सभासदाची कन्या सोडुन इतर कोणत्याही स्वरुपाच्या नाते संबंधासाठी ही योजना लागू राहणार नाही. उदा. भाची, नात, पुतणी इ.

१०. या योजनेचा लाभ घेण्यासाठी संबंधीतांनी **प्रथमतः बँकेत विवाहापुर्वी येवुन बँकेच्या विहीत नमुन्यातील अर्ज भरुन** व आवश्यक त्या कागदपत्रांची पुर्तता करुन देणे आवश्यक राहील.

११. काही अपवादात्मक परिस्थितीत संबंधीत **कन्येचा विवाह झालेनंतर** जर असा विनंती अर्ज प्रस्ताव प्राप्त झाला तर त्याला या योजनेअंतर्गत लाभ देणेबाबत मा.संचालक मंडळ योग्य तो निर्णय घेईल.

१२. या योजनेतील करण्यात आलेली तरतुद संपल्यास सदरचा लाभ संबंधीत कन्येस **पुढील वर्षीच्या तरतुदीतून** देण्यात येईल.

१३. गरजेनुसार या योजनेत काही नविन **नियम टाकण्याचा, कमी करण्याचा** किंवा **पुर्ण योजनाच बंद** करण्याचा संचालक मंडळास पुर्ण अधिकार राहील.

| | | |
|---|---|---|
| **(अण्णासाहेब बडाख)** | **(धनश्री कापडणीस)** | **(रविंद्र आंधळे)** |
| **प्रभारी मुख्य कार्यकारी अधिकारी** | **उपाध्यक्षा** | **अध्यक्ष** |